# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
## पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे.फोन नं.०२२-२९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्र.५८-२२ | दिनांक: २२.०२.२०२२.

**अपहरणाच्या गुन्हयाची उकल करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.**

दिनांक २५.०१.२०२२ रोजी नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतुन एका अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याने **नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि क्र. ४३/२०२२ भादविस कलम ३६३** प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध घेणेबाबत मा. वरिष्ठांनी सुचना दिलेल्या होत्या. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनानुसार सदर गुन्हयाचा समांतर तपासा दरम्यान अपहृत मुलीचे आई-वडिल, मित्र/मैत्रिण व इतर नातेवाईक यांच्याकडे विचारपुस करुन अपहृत मुलीबाबत माहिती घेतली असता फिर्यादी राहत असलेल्या परिसरात राहणारा मुलगा आशुतोष प्रसाद, वय-२३ वर्ष हा देखील निघुन गेल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने गुन्हयाचा तांत्रिक तपास करुन अपहृत मुलीचा गेले आठ दिवस उत्तन, गोराई, बोरीवली, सांताक्रुज व नालासोपारा परिसरात अथक परिश्रम घेवुन शोध घेत असतांना दि.२०.०२.२०२२ रोजी आशुतोष प्रसाद याने आनंद नगर, वसई (प) येथील साईबाबा मंदिरा जवळ असलेल्या एका मोबाईलच्या दुकांनातुन पेटीएमव्दारे मोबाईल हॅण्डसेट खरेदी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने संबंधीत दुकानाचे मालकास भेटुन व त्यांना विश्वासात घेवुन आशुतोष प्रसाद याने विकत घेतलेला मोबाईल दुकानात परत घेवुन येण्यासाठी काहीतरी बहाणा करुन दुकानात परत येण्यास भाग पाडले व तो दुकांनात येताच मुलगा आशुतोष व त्याच्या सोबत असलेली अपहृत मुलगी असे दोघांनाही ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे प्राथमिक विचारपुस करुन त्यांना नवघर पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पोहवा/९२०१९ विजय निलंगे, पोहवा/९५००८ रामचंद्र पाटील व मपोना/०३०१५ वैष्णवी यंबर यांनी केली आहे.